# प्रेसनोट

दिनांक–२७/०२/२०२५
अँन्टी करप्शन ब्युरो, अकोला

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | अँन्टी करप्शन ब्युरो अकोला घटक |
| २ | आरोपीचे नांव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री. देवानंद गणपत जामनिक, वय–५७ वर्ष, व्यवसाय–शेतमजुरी रा. ग्राम उमई, पोस्ट–जांभा बु. ता. मुर्तिजापुर जि. अकोला (खाजगी इसम) |
| ३ | सापळा तारीख | दिनांक २७/०२/२०२५ रोजी |
| ४ | मागणी केलेली रक्कम | ३,०००/– रूपये लाच मागणी करून तडजोडी अंति १,०००/–रूपये लाच रक्कम मागणी केल्याचे निष्पन्न झाले. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | १,०००/– रूपये |
| ६ | घटनास्थळ | आंबेडकर चौक, एस.टी.स्टॅन्ड मुर्तिजापुर, ता.मुर्तिजापुर जि. अकोला |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील तक्रारदार यांनी दिनांक–२६/०२/२०२५ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय अकोला येथे तक्रार दिली की, तक्रारदार यांच्या वडिलांनी त्यांच्या नावे ग्राम सालतवाडा ता. मुर्तिजापुर जि. अकोला येथील विटा सिमेंटचे पक्के बांधकाम केलेले घर बक्षीसपत्रान्वये तक्रारदार यांचे नावावर केले आहे. सदर बक्षीसपत्राची नोंद ग्राम पंचायत अभिलेखावर होवुन घराचा नमुना ८ अ मिळणेकामी तक्रारदार यांनी सदर बक्षीसपत्राची एक झेरॉक्सप्रत सालतवाडा गट ग्रामपंचायत येथे दिलेली आहे.

गट ग्रामपंचायत सालतवाडा येथील महीला सरपंच सौ. सिमा देवानंद जामनिक यांचे सर्व काम त्यांचे पती गैरअर्जदार श्री. देवानंद जामनिक पाहत असल्याने तक्रारदार हे सरपंच पती गैरअर्जदार श्री. देवानंद जामनिक यांना भेटले व सदर बक्षिसपत्राची नोंद ग्रामपंचायत अभिलेखावर करून घराचा नमुना ८ अ देण्यास विनंती केली. त्यावर सरपंच पती श्री. देवानंद जामनिक यांनी तक्रारदारला ३,०००/– रूपये लाच रकमेची मागणी करीत आहेत, अशा आशयाची तक्रारदार दिली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २६/०२/२०२५ रोजी आंबेडकर चौक, एस.टी.स्टॅन्ड, मुर्तिजापुर येथे शासकिय पंचासमक्ष पडताळणी कार्यवाही केली असता, गैरअर्जदार श्री. देवानंद जामनिक यांनी बक्षिसपत्राची नोंद ग्रामपंचायत अभिलेखावर करून घराचा नमुना ८ अ देण्याकरीता सरपंच पती गैरअर्जदार श्री. देवानंद जामनिक यांनी तडजोडी अंति १,०००/– रूपये लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

दिनांक २७/०२/२०२५ रोजी शासकिय पंचासमक्ष आंबेडकर चौक, एस.टी.स्टॅन्ड, मुर्तिजापुर येथे सापळा कार्यवाही आजविली असता ग्राम सालतवाडा गट ग्रामपंचायतच्या महिला सरपंच यांचे पती गैरअर्जदार श्री. देवानंद जामनिक तक्रारदार यांच्याकडुन १,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारल्याने अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय अकोला येथील अधिकाऱ्यांनी सापळा कार्यवाही करून नमुद आरोपी श्री. देवानंद जामनिक (खाजगी इसम) यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७A प्रमाणे पोलीस स्टेशन मुर्तिजापुर शहर ता. मुर्तिजापुर जि. अकोला येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री. मारूती जगताप, अपर पोलीस अधिक्षक श्री. सच्छिंद्र शिंदे, अँ.क.ब्युरो अमरावती व पोलीस उपअधिक्षक श्री. मिलींदकुमार बहाकर अँ.क.ब्युरो अकोला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सचिन सावंत, अँ.क.ब्युरो अकोला तसेच पोलीस अंमलदार डिगांबर जाधव, किशोर पवार, प्रदिप गावंडे, अभय बावस्कर, निलेश शेगोकार, श्रीकृष्ण पळसपगार, चालक पो.हवा. सलिम खान सर्व अँ.क.ब्युरो अकोला यांनी केली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते कि कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अँन्टी करप्शन ब्युरो अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा

मोबाईल क्र. श्री. मिलींद बहाकर पोलीस उपअधिक्षक–९१५८८२२६७६
श्री सचिन सावंत पोलीस निरीक्षक–८८५५८३०८३०

ऑफिस फोन नं. ०७२४–२४१५३७०

टोल फ्रि क्रं. १०६४

(सचिन सावंत)